# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

लोकमत पुणे, शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०१५ ४

### महाविद्यालीन जीवनात ध्येय निश्चित करा

**संतोष गिरीगोसावी : राजगुरु विद्यालयात एनएसएस विभाग**

राजगुरुनगर : ''महाविद्यालयीन जीवन हे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला वळण देणारे आहे. या काळातच त्यांनी ध्येयनिश्चिती करून शिक्षण घ्यायला हवे,'' असे आवाहन खेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाची सुरवात करण्यात आली. त्याचे उद्घाटन संतोष गिरीगोसावी यांच्या हस्ते झाले. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे, अंकुश कोळेकर, विद्यार्थी-प्रतिनिधी आकाश नवरे, काजल बोऱ्हाडे आदी उपस्थित होते.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शुभारंभप्रसंगी बोलताना पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी.

गिरीगोसावी म्हणाले, ''राष्ट्रीय सेवा योजना विभागात देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा, सामाजिक बांधिलकी, श्रमसंस्कार ही मूल्ये अनौपचारिक शिक्षणाद्वारे शिकविताना शरीर व मन संवर्धनासाठी प्रयत्न केले जातात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता असते, फक्त त्यांनी योग्य ध्येयनिश्चिती करून जीवनात काय बनायचे, हे प्रथम ठरवायला हवे.''

देवेंद्र बुट्टे-पाटील म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाजापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करावा. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. दिलीप मुळूक यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख